# जळगाव येथे नर-मादी बिबट्यांचा धुमाकूळ

**चितळी (वार्ताहर)-** राहाता तालुक्यातील जळगाव येथे २ बिबट्यांनी मानवी वस्तीत मोठा धुमाकूळ घालत पाळीव श्वानावर रात्रीच्या वेळी हल्ला करून ठार केले तर दुसऱ्या श्वानाला ठार करण्याच्या तयारीत असलेल्या बिबट्याला नागरिकांनी फटाके फोडून पिटाळून लावले. यामुळे बिबट्याच्या जबड्यातून दुसऱ्या श्वानाची सुटका झाली.

शिवाजी अण्णासाहेब चौधरी यांच्या वस्तीवर शुक्रवार रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास घराशेजारील भेंडीच्या शेतात २ बिबटे सायंकाळपासून दबा धरून बसले होते. बिबट्याने अचानक पाळीव श्वानावर झडप घातली. शिवाजी चौधरी यांच्यासह घरातील सदस्यांना श्वानाच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी बाहेर बघितले असता घरासमोर बिबट्याने श्वानाला जबड्यात धरल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्यांनी आरडाओरड केली. या दरम्यान बिबट्याने दोन श्वानांपैकी एकाला ठार केले. मोठा आवाज करत बिबट्याला हटवण्याचा प्रयत्न केला. एका श्वानाला ठार केल्यानंतर पुढील दहा ते पंधरा मिनिटे बिबटे घराजवळ तळ ठोकून उभे होते. फटाके फोडल्यामुळे बिबट्याने तिथून धूम ठोकली! शेजारील सुरेश सखाराम चौधरी यांच्या घराजवळ जाऊन पाळीव श्वानावर देखील हल्ला केला. ऊस, गिन्नीगवत, द्राक्ष, आंब्याच्या बागेत बिबटे दिवसा लपत असून रात्रीच्या वेळी बाहेर पडतात आणि त्यांना मुबलक भक्षही मिळत आहे. या बिबट्यांच्या धास्तीने शेतात काम करण्यासाठी मजूरही मिळेनासे झाले आहे. त्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. या बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सरपंच शिवाजीराव साबदे यांनी केली आहे.

# राहुरी खुर्द येथे गुटखा व सुगंधी तंबाखूसह पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

## राहुरी व 'एसपीं'च्या संयुक्त पोलीस पथकाची कारवाई, एकजण ताब्यात

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** गेल्या अनेक वर्षांपासून राहुरी तालुक्यात गुटखा व सुगंधी तंबाखू विकणारा राहुरी खुर्द येथील पवन गिरासे याच्या दुकानावर काल २६ जुलै रोजी, दुपारच्या सुमारास राहुरी येथील पोलीस पथक व जिल्हा अधिक्षकांच्या पथकाने संयुक्त कारवाई करून जवळपास पाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून राहुरी तालुक्यातील काना कोपऱ्यात गुटखा व सुगंधी तंबाखूची विक्री राहुरी खुर्द येथून होत असत. मात्र अद्याप राहुरी खुर्द येथील गुटखा विक्री करणाऱ्याला पकडण्यात राहुरी पोलीसांना अपयश येत होते. राज्यात गुटखा बंदी असूनही राहुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री सुरू असल्याने नागरीक संताप व्यक्त करीत होते. राहुरी खुर्द येथील




एका तालुकास्तरावरील वितरकाला नगरच्या वितराकडून गुटखा पोहच होतो. त्यानंतर सर्व साखळी फिरून हाच गुटखा तालुक्यात सर्व खेडे व शहरात वितरण करण्याची व्यवस्था चालते. जिल्हा वितरकाला त्याचा व्यवसाय जास्त वाढावा म्हणून सर्व तालुका स्तरावरील वितरकांना इतर जिल्ह्यातून माल न आणता कितीही भाव लावला तरी त्याच्याकडूनच माल घेण्याची अघोषित सक्ती संबंधित यंत्रणेकडून भ्रमणध्वरीद्वारे केली जात असत. हीच पद्धत तालुकास्तरावरील डीलर बाबतही राबविले जाते. ज्यांनी बाहेरून माल आणला त्यांच्यावर छापे टाकण्यात येईल, असा निरोप संबंधित यंत्रणेकडून विक्रेत्यांना दिला जात असे. त्यामुळे इतरांपेक्षा प्रत्येक मालाला २०० ते ३०० रुपये जास्त तालुका वितरकाकडून घेतले जात असल्याची तक्रार स्थानिक किरकोळ विक्रेते चर्चेतून करताना दिसून येत. या गोरख धंद्यातून मोठी माया खालपासून वरपर्यंत शासकीय यंत्रणेला पोहोच होत असल्याने 'आमचे कोणीच काही करू शकत नाही' अशा थाटात ही मंडळी व्यवसाय करीत असत. याबाबत अशी माहिती समोर आली आहे.

गेल्या महिन्यापासून जिल्ह्यात गुटखा व सुंगधीत मावा विक्रेत्यांवर अनेक कारवाईचा धडका सुरू असूनही तरी देखील पवन गिरासेचा अवैध व्यवसाय राजरोसपणे सुरूच होता. काल, २६ जुलै रोजी, दुपारी १२.३० वाजेच्या दरम्यान, अहिल्यानगरचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांचे पथक व राहुरी पोलीस पथकाने संयुक्त कारवाई करून राहुरी खुर्द येथील पवन गिरासे याच्या दुकानावर छाप टाकला. यावेळी दुकानात विविध प्रकारचा गुटखा, सुपारी, सुगंधी तंबाखू, मावा बनवण्याचे मशीन तसेच एक छोटा मालवाहतुक टेम्पो असा सुमारे पाच लाख रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलीसांनी हा मुद्देमाल जप्त करून आरोपी पवन उर्फ पृथ्वीराज दगडूसिंग गिरासे याला ताब्यात घेऊन गजाआड केले आहे. त्याच्यावर राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पथकातील पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलिस नाईक अरविंद भिंगारदिवे, सुनिल पवार, दिनेश मोरे, शंकर चौधरी, उमेश खेडकर, दिगंबर कारखेले, मल्लिकार्जुन बनकर, अजय साठे, अमोल कांबळे, योगेश भिंगारदिवे तसेच राहुरी येथील पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, हवालदार सुरज गायकवाड, इफ्तेखार सय्यद, प्रमोद ढाकणे आदींच्या पोलिस पथकाने केली आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज शंभराव्या शाखा फलकाचे अनावरण

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज दि.२७ जुलै रोजी दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शंभराव्या शाखा फलकाचे अनावरण राहुरी फॅक्टरी येथे होणार असल्याची माहिती माजी आमदार लहू कानडे यांनी दिली.

आ.लहू कानडे यांनी गाव तेथे शाखा हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघामध्ये प्रत्येक गावात पक्षाची शाखा उघडण्याचे काम पूर्ण होत असून श्रीरामपूर व राहुरी नगरपालिका हद्दीत प्रभाग निहाय शाखा उघडण्यात येत आहे.

मतदारसंघातील शंभरावा फलक राहुरी फॅक्टरी येथे लावण्यात येणार आहे. योगायोगाने उपमुख्यमंत्री अजित पवार राहुरीच्या दौऱ्यावर येत असल्याने सदर फलकाचे अनावरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हस्ते करण्याचा मनोदय माजी आ.लहू कानडे यांनी व्यक्त केला आहे.

राहुरी येथील कार्यक्रम आटोपून देवळाली येथे आपल्या मामाकडे येत असताना ते सदर फलकाचे अनावरण करणार आहे. तरी या फलक अनावरणासाठी पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अरुण पाटील नाईक यांनी केली आहे.

# दिव्यांगाला प्रवाहात आणणे पडले महागात

## कर्मचाऱ्याला ५० हजार रुपयांचा भुर्दंड

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** एका दिव्यांगाला प्रवाहात आणण्याची जबाबदारी एका कर्मचाऱ्याला चांगलीच महागात पडली. ५० हजार रुपयांचा भुर्दंड भरण्याची वेळ या कर्मचाऱ्यावर आली आहे.

बेलापूर परिसरातील एका परिवारात एक मुलगा दिव्यांग आहे. त्याची माहिती पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना मिळाली. त्यांनी एका कर्मचाऱ्याला आदेश दिला की, सदर दिव्यांग मुलाच्या घरी जाऊन त्याला प्रवाहात आणा. वरिष्ठाच्या आदेशानुसार तो कर्मचारी त्या दिव्यांग मुलाच्या घरी गेला आणि त्याने दिव्यांग व्यक्तीला मिळणारे लाभ व शासकीय योजनांची माहिती दिव्यांग व्यक्तीच्या आईला दिली. तसेच अहिल्यानगर येथे जाऊन दिव्यांगाचे प्रमाणपत्र काढून आणण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. काही अडचण आल्यास माझ्या फोन नंबरवर संपर्क साधा, असे सांगून त्या कर्मचाऱ्याने आपला फोन नंबर त्या महिलेला दिला. त्यानंतर दिवसभर त्या महिलेने वेगवेगळ्या कारणांमुळे संबंधित कर्मचाऱ्याला फोन केले. तो कर्मचारी प्रामाणिकपणे दिव्यांगाची माहिती आणि येणाऱ्या अडचणींबाबत सांगत होता. हे सर्व झाल्यानंतर सायंकाळी ती महिला विचारपूस करत राहुरी येथील कर्मचाऱ्यांच्या घरी गेली आणि तिथे आरडा-ओरडा करून हा मला दिवसभर घेऊन फिरला, याने नको ते केले, असे सांगून गोंधळ सुरू केला. झालेला प्रकार पाहून तो कर्मचारीही गडबडून गेला. आजूबाजूचे नागरिक जमा होऊ लागले. त्या महिलेने आणखी जोरात ओरडायला सुरुवात केली, त्यामुळे त्या कर्मचाऱ्याने आपल्या मित्रांचा सल्ला घेऊन त्या महिलेसह बेलापूर गाठले. बेलापूरला आल्यानंतर ते सरळ पोलीस स्टेशनला गेले, तिथे आपल्याला न्याय मिळेल, अशी अपेक्षा त्या कर्मचाऱ्याला होती, परंतु तिथे संबंधित महिला आपल्या भूमिकेवर ठाम राहिली. त्यामुळे कर्मचारी आणखीच गडबडून गेला आणि त्याने गावातील काही व्यक्तींना बोलावले. परंतु, त्याचा काहीच फायदा झाला नाही. अखेर त्या महिलेने प्रकरण मिटविण्यासाठी आपला प्रस्ताव ठेवला. मनात नसतानाही सर्वांच्या आग्रहाखातर त्या कर्मचाऱ्याला पन्नास हजार रुपयांचा भूर्दंड बसला. वास्तवात तो कर्मचारी दिवसभर पंचायत समितीत आपल्या सहकाऱ्यांबरोबर काम करत होता. पण एका महिलेसमोर त्याला हतबल व्हावे लागले.

# कैलास शेळके यांना गुणवंत गणित अध्यापक पुरस्कार

**राहाता (वार्ताहर)–** कैलास दत्तात्रेय शेळके यांना अहिल्यानगर



जिल्हा गणित अध्यापक मंडळाने गुणवंत गणित अध्यापक म्हणून जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर येथील फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

कैलास शेळके हे गेल्या १२ वर्षांपासून कोपरगाव तालुक्यातील वारी येथील रयत शिक्षण संस्थेच्या रामेश्वर विद्यालयात गणित विज्ञान विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांनी शिक्षणातून घडविलेले अनेक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत उच्च पदावर कार्यरत आहेत. शेळके हे अत्यंत प्रामाणिक, अभ्यासू, आणि चिकाटीने अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याचे काम करतात. तालुका पातळीवरील गणित विज्ञान विषयाचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांचा परिचय सर्वश्रुत आहे. संस्था पातळीवर तंत्रस्नेही शिक्षक, तज्ञ विषय मार्गदर्शक, करियर मार्गदर्शक व समुपदेशक म्हणून उल्लेखनीय कामकाज सुरू आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक केले जात आहे.

# राहुरीत महामार्गावर सफरचंद भरलेला मालट्रक उलटला

**राहुरी (तालुकाप्रतिनिधी)–** नगर-मनमाड महामार्गावर शिर्डीहून अहिल्यानगरकडे सफरचंद घेऊन जाणारा मालट्रक राहुरीतील गाडगे महाराज आश्रम शाळेसमोर महामार्गावरील गतिरोधकाचा अंदाज न आल्याने व स्टेअरींग रॉड तुटल्याने नियंत्रण सुटून उलटला. यामुळे महामार्गावर सफरचंदाचा खच पडला होता. महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. ही घटना काल दि. २६ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास घडली.



## काहीकाळ वाहतूक ठप्प

सदर घटनेची माहिती पोलिसांना मिळताच रात्रीच्या गस्तीवर असणाऱ्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. एकेरी वाहतूक वळविण्यात आली आणि सकाळपर्यंत मालट्रकमधील सफरचंदाचे खोके काढून क्रेनच्या साह्याने अपघातग्रस्त मालट्रक बाजूला घेण्यात आला.

यापूर्वीही याच ठिकाणी वाहने उलटल्याच्या घटना घडल्या आहेत. या ठिकाणी गतिरोधकच्या सूचना फलक व दिशादर्शक नसल्याने वाहन चालकांना गतिरोधक व मोठे वळण असल्याचा अंदाज येत नाही, त्यामुळे अपघात घडतात. येथील गतिरोधक महामार्गावरील वाहनांची गती कमी होऊन वाहने व नागरीकांसाठी महामार्ग ओलंडल्या करता आहे. मात्र हे गतिरोधक महामार्गावरील जड वाहतुकीमुळे सपाट झाले आहे. याठिकाणी बाजूला झेब्रा क्रॉसिंग नाही, पांढरे पट्टे नाहीत, रेडियम देखील नाहीत. ते असणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहन चालकांना गतिरोधकाचा अंदाज येत नसल्याने नियंत्रण सुटून नेहमी अपघात होत असतात. काल पुन्हा ज्या ठिकाणी मालट्रक उलटल्याने महामार्गावरील गतिरोधकांची दुरूस्ती करून सूचना फलक लावण्याची मागणी नागरीकांमधून होत आहे.

# घोडेगावात कांद्याच्या आवकेत मोठी वाढ

**नेवासा–** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव कांदा मार्केटमध्ये शनिवारी आठवड्याच्या शेवटच्या दिवशी कांद्याच्या आवकेत १० हजार गोण्यांनी वाढ झाली.

६५ हजार ७२१ गोण्या कांद्याची आवक झाली. तर भावातही प्रतिक्किंटल १०० रुपयांनी वाढ झाली. एक नंबरच्या कांद्याला १४००ते १५०० रुपये भाव मिळाला. दोन नंबरला १२०० ते १३०० रुपये, ती नंबरला १००० ते ११०० रुपये, गोल्टा १००० ते ११०० रुपये, गोल्टी ६०० ते ७००, जोड हलका व डॅमेज कांद्याला २०० ते ५०० रुपये तर अपवादात्मक भाव १६०० ते १८०० रुपयांपर्यंत निघाला.

# अकोले-देवठाण रस्त्यावर देशी-विदेशी दारुचा साठा वाहनासह जप्त

**अकोले (प्रतिनिधी)–** तालुक्यातील अवैध दारु विक्रेत्यांविरुद्ध सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांनी जोरदार काम सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर अकोले-देवठाण रस्त्यावर शनिवारी (दि. २६) सकाळी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुमारे साडेचार लाखांचा देशी व विदेशी दारुचा साठा वाहनासह जप्त करण्यात आला आहे. या धडक कारवाईबद्दल दारूबंदी आंदोलनाचे कार्यकर्ते व समाजातून समाधान व्यक्त होत आहे.

अधिक माहिती अशी, की अकोले-देवठाण रस्त्यावर तांभोळ शिवारात खाजगी वाहनातून बेकायदेशीररित्या देशी-विदेशी दारुची वाहतूक होत असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने संगमनेरचे राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक यांनी पथकासह सापळा रचला. त्यात कार (क्र. एमएच.०५, बीएस.८५४६) या रस्त्याने सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास येत असल्याचे दिसून आले. पथकाने हे वाहन थांबवून वाहनाची तपासणी केली असता देशी दारुचे १८ खोके (८६४ बाटल्या) व ३ खोके (३०० बाटल्या), विदेशी दारुच्या ३७ व ३३ बाटल्या असे एकूण २३ खोके असा एकूण वाहनासह ४ लाख ४८ हजार ९९० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत वाहन चालक सचिन सुदाम जाधव (वय ३३, रा.पोखरी बाळेश्वर, ता. संगमनेर) यास अटक करून अकोले पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. या आरोपीवर काही दिवसांपूर्वीच कारवाई होऊन त्याला जामीन मिळाला होता. मात्र, पुन्हा आज नव्याने त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई निरीक्षक सुनील सहस्रबुद्धे, दुय्यम निरीक्षक गोकुळ नायकोडी, राहुल केदारी, प्राची देखणे, जवान विपुल कर्पे, वसंत पालवे, महिला जवान सरस्वती वराट, स्वाती फटांगरे, प्रणाली दिघे, कीर्ती एरंडे, मोनाली पोखरकर, विमल घोलप, मोहिनी घोडेकर यांनी केली. पुढील तपास निरीक्षक सुनील सहस्रबुद्धे हे करीत आहेत.

पान १ वरुन

## भंडारदरातून विसर्ग वाढविला

विश्रांती घेतली होती काल शुक्रवार पासून पावसाचे पुनरागमन झाले आहे. शुक्रवारच्या तुलनेत शनिवारी पाणलोटात पावसाचा जोर वाढल्याने मुळा नदीच्या पाणी प्रवाहात मोठी वाढ झाली आहे. काल सकाळी मुळा नदी पात्रातून ५०२३ क्युसेस विसर्ग सुरू होता तर सायंकाळी सहा वाजता त्यात वाढ होऊन २३,०७६ क्युसेसने पाणी मुळा धरणाकडे झेपावत होते. त्यामुळे धरणात आज विक्रमी आवक होणार असून पावसाचा जोर टिकून राहिल्यास या धरणातून विसर्गही वाढविण्यात येणार आहे.

यावर्षी मुळाधरण लवकरच 'ओव्हरफ्लो' होण्याचे संकेत आहे. गेल्या ३६ दिवसात मुळा धरणात तब्बल ११,००० दलघफू नवीन पाण्याची आवक झाली आहे. सध्या मुळा धरणात १९ हजार ८१६ दलघफू इतका पाणीसाठा असून उजवा कालव्यातून १ हजार १०० क्युसेस तर डाव्या कालव्यातून १५० क्युसेकने ने आवर्तन सुरू आहे.

## जायकवाडीचा उपयुक्त साठा...

टीएमसी पाण्याची आवक झाली. यामुळे दारणा धरणातून ७,८०६ क्युसेसने विसर्ग करण्यात येत आहे. काल सकाळी मागील २४ तासांत घोटी येथे ६७ मिमी, दारणा धरणाच्या भिंतीजवळ ३८ मिमी पावसाची नोंद झाली. इगतपुरीलाही पावसाचा जोर कायम आहे. भामच्या भिंतीजवळ ६५ मिमी, भावलीच्या भीतीजवळ ९९ मिमी पावसाची नोंद झाली. वाकीला ६२ मिमी पावसाची नोंद झाली. दारणात पाणीसाठा काल सकाळी ८५.५० टक्के इतका होता. नवीन येणाऱ्या पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येत आहे. दारणातून ११५५९ क्युसेक समूहातील भाममधून ३,२५२ क्युसेक, भावलीतून १,२१८ क्युसेकने विसर्ग सुरू आहे. भाम आणि भावली दोन्ही प्रकल्प १०० टक्के भरले आहेत. वाकी ८८.२६ टक्क्यांवर स्थिर आहे.

गंगापूर धरणाच्या पाणलोटात काल पावसाचे समाधानकारक आगमन होत होते. गंगापूरच्या पाणलोटात काल सकाळपर्यंत मागील २४ तासांत आंबोलीला १०२ मिमी, त्र्यंबकला ७६ मिमी, गंगापूर धरणाच्या भिंतीजवळ ४७ मिमी पावसाची नोंद झाली. कश्यपीला ५० मिमी, गौतमी गोदावरीला ५१ मिमी पावसाची नोंद झाली. गंगापूर धरणात सकाळी मागील २४ तासांत २२६ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. गंगापूरचा पाणीसाठा ६७.६३ टक्क्यांवर पोहचला आहे. या धरणातून काल विसर्ग सोडण्यात आलेला नाही. काल सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत या १२ तासात गंगापूरला १२ मिमी, कश्यपिला ११ मिमी, गौतमीला ५१ मिमी पावसाची नोंद झाली. तर त्र्यंबकला ९ मिमी, आंबोलीला ३४ मिमी पावसाची नोंद झाली. वालदेवी धरणातून २४१ कुयुसेस, आळंदीतून २४३ कुयुसेस, कडवातून २४५८ कुयुसेस, वाघाडमधून ५४ कुयुसेस, विसर्ग सुरू आहे. वरील सर्व धरणांचे विसर्ग नांदुरमधमेश्वर बंधाऱ्यात दाखल होत आहेत. त्यामुळे काल सायंकाळी ६ वाजता या बंधाऱ्यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत १५७७५ कुयुसेस, विसर्ग सुरू होता. काल सकाळपर्यंत या बंधाऱ्यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत ३४ टीएमसी हून अधिक पाणी वाहून गेले आहे. जायकवाडीत काल शनिवारी सायंकाळी ६ वाजता उपयुक्त पाणी साठा ८०.७२ टक्क्यांवर पोहचला. या धरणात मृतसह एकूण पाणी ८७.९ टीएमसी इतका झाला आहे. तर उपयुक्त पाणीसाठा ६१.८ टीएमसी इतका झाला आहे. काल सायंकाळी ६ वाजता या जलाशयात १४८०३ कुयुसेस,विसर्ग दाखल होत होता.

## 'स्थानिक स्वराज्य'च्या निवडणूक...

निवडणूक आयुक्तांसोबत राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विशेष कार्य अधिकारी अ. गो. जाधव हे देखील उपस्थित राहणार आहेत. बैठकीसाठी विभागीय आयुक्त, नाशिकसह धुळे, नंदुरबार, जळगाव व अहिल्यानगर जिल्हाधिकारी, नाशिक, जळगाव, धुळे, अहिल्यानगर व मालेगाव महापालिकांचे आयुक्तांना पाचारण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर परिषदा व नगरपंचायती तसेच महापालिकांमधील सदस्य संख्या, मतदार यादी विभाजनाचे नियोजन, स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय मतदान केंद्रांची संख्या, मतदान यंत्र, इतर निवडणूक साहित्याचा आढावा, पूर्वतयारी, मतदान केंद्रांच्या इमारतींमधील आवश्यक सुविधा, आवश्यक निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची उपलब्धता यांचा आढावा घेणार आहेत.

## यंदा गुरूजींना १२८ दिवस सुट्ट्या!

आणि २४ कामाचे दिवस, डिसेंबर महिन्यांत २ सार्वजनिक सुट्ट्या, ४ रविवार आणि २५ दिवस कामाचे राहणार आहेत.

जानेवारी २०२६ मध्ये २ सार्वजनिक सुट्ट्या, ४ रविवार आणि २५ कामाचे दिवस राहणार असून फेब्रुवारी महिन्यांत १ सार्वजनिक सुट्टी, ४ रविवार आणि कामाचे २३ दिवस, मार्च महिन्यांत ६ सार्वजनिक सुट्ट्या, ५ रविवार आणि २० कामाचे दिवस राहणार आहेत. एप्रिल महिन्यांत २ सार्वजनिक सुट्ट्या ४ रविवार आणि २४ दिवस कामाचे दिवस राहणार आहेत. तसेच मे महिन्यांत २ सार्वजनिक सुट्ट्या, २५ दिवस दिर्घकालीन सुट्ट्या, ४ रविवार असे नियोजन करण्यात आले आहे. यानुसार जिल्ह्यात शिक्षकांना ७६ दिवस सार्वजनिक व प्रासंगिक २५ दिर्घकालीन, ५२ रविवारच्या सुट्या अशा एकूण १२८ दिवस सुट्ट्या मिळणार असून कामकजाचे २३७ दिवस राहणार आहेत.

**अशा आहेत सुट्ट्याचे प्रकार**

५२ रविवार, १९ सार्वजनिक सुट्ट्या, २ स्थानिक सुट्या, १० प्रासंगिक सुट्ट्या, ७ दिवाळीच्या सुट्ट्या, ३७ उन्हाळी सुट्या व १ राखीव सुट्ट्या या सुट्ट्यांचा समावेश आहे.

**उन्हाळ्यात १६ मार्चपासून सकाळची शाळा**

उन्हाळ्यात विद्यार्थ्यांचे उन्हापासून संरक्षण व्हावे, यासाठीचे नियोजन आतापासून करण्यात आले आहे. या नियोजनात पुढील वर्षी मार्च २०२६ मध्ये १६ तारखेपासून सकाळी ७ ते दुपारी १२ या वेळेत शाळा भरणार आहेत. सकाळच्या सत्रातील ही शाळा ३० एप्रिलपर्यंत भरवण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

**रमाजनमध्ये उर्दुशाळा भरणार सकाळी**

जिल्ह्यात रमजान महिन्यांत जिल्ह्यातील उर्दुशाळा या सकाळाच्या टप्प्या भरवण्यात येणार आहे. ही सवलत केवळ उर्दुशाळांना देण्यात आली आहे. सुट्ट्यांचे नियोजन करून प्रत्येक तालुक्यातील गटविकास अधिकारी यांनी शाळांच्या तासिका पूर्ण होतील, यासानुसार नियोजन करण्याच्या सुचना शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी दिल्या आहेत.

## गेल्यावर्षी ११ लाख, यंदा अवघ्या...

केली आहे. आता शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के आणि दोन्ही हंगामातील नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के एवढा हप्ता भरावा लागणार आहे. एक रुपयात पीक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना एकूण चार ट्रिगरच्या आधारे भरपाई दिली जात होती. नवीन बदलांनुसार, यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणी पश्चात नुकसान भरपाई हे तीन ट्रिगर रद्द करण्यात आले आहेत. आता केवळ पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीवर आधारित नुकसान भरपाई मिळणार आहे. हे नियम जाचक ठरत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. नगर जिल्ह्यात कर्जदार ७०४ तर बिगर कर्जदार शेतकऱ्यांन पीकविम्यासाठी नोंदणी केली आहे. अशी ८३ हजार ४४.८ हेक्टर क्षेत्राची नोंदणी झाली असून शेतकऱ्यांना हप्ता ८ कोटी ७९ लाख २७ हजार ३१५.८९ रुपये जमा झाला आहे.

**जेवढे पेरले तेवढेच नोंदवा**

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी जेवढे पेरले, तेवढीच नोंद पीक विम्याच्या अर्जात करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून केले जात आहे. खोट्या माहितीवर विश्वास न ठेवता यंदाच्या शासन निर्णयात काय बदल करण्यात आले, याची माहिती घेऊनच अर्ज भरण्याचे शेतकऱ्यांना सांगितले जात आहे. बोगस विमा उतरवल्याचे आढळून आल्यास संबंधित खातेदाराचा आधार क्रमांक पाच वर्ष काळ्या यादीत टाकून त्याला पाच वर्ष कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ देण्यात येणार नाही, असेही २४ जून २०२५ च्या शासन निर्णयात नमूद आहे.

**पीक विमा योजनेतील सहभागी**

अहिल्यानगर ६०८६, अकोले ११६३१, जामखेड २७२६६, कर्जत ५५२५, कोपरगाव ६९९६, नेवासा १५०९४, पारनेर १४८०७, पाथर्डी २४५८०, राहाता ९२०२, राहुरी ६७९९, संगमनेर ७२०८, शेवगाव १३७१७, श्रीगोंदा ३२८२, श्रीरामपूर ४३३५.

**ई-पीक पाहणी बंधनकारक**

यासोबतच पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद बंधनकारक करण्यात आली आहे. ज्या पिकांची नोंद पीक पाहणी अंतर्गत करण्यात आली आहे. त्याच पिकांसाठी विमा उतरवता येणार आहे. पीकविमा अर्जखरीप हंगामासाठी ३१ जुलैपर्यंत पीकविमा अर्ज भरता येणार आहेत. यामध्ये शेतकरी खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामातील पिकांचा विमा भरू शकतात.

## अकोलेतील वाघापूर येथे...

तालुक्यातील वाघापूर येथे घडलेल्या प्रकारामुळे आता अकोले तालुक्यात भितीचे वातावरण पसरले आहे.वाघापूर येथे घडलेल्या घटनेतील आरोपी कधी जेरबंद होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यां विरुद्ध अकोले पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक मोहन बोरसे व त्यांचे सहकारी करत आहेत.